# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई- ४०० ०५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९ ई-मेल- jtdirrom@gmail.com


क्र.४/विकामुं/तांत्रिक-३/प्रवेश/२०१८/२७७८
दिनांक : 18 AUG 2018

प्रति,
प्राचार्य
विनाअनुदानित अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र
पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष पोष्ट एस.एस.सी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोष्ट एच.एस.सी पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या शासकीय व अशासकीय अनुदानित विद्यापीठ विभागातील संस्थांमध्ये केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांकरिता घेण्यांत येणा-या अतिरिक्त प्रवेश फेरीमध्ये विनाअनुदानित संस्थांचा समावेश करणेबाबत.

संदभ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांची सुचना क्र. १०/ एनजीपी/पदविका/अतिरिक्त फेरी/२०१८/९९९ दि. १८.८.२०१८

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष पोष्ट एस.एस.सी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोष्ट एच.एस.सी पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या शासकीय व अशासकीय अनुदानित विद्यापीठ विभागातील संस्थांमध्ये केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांकरिता घेण्यांत येणा-या अतिरिक्त प्रवेश फेरी आयोजित करण्यांत येते. तसेच विनाअनुदानित संस्थांना केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागा भरण्याची परवानगी असते.

परंतु शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधे केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांकरिता घेण्यांत येणा-या अतिरिक्त प्रवेश फेरीमध्ये विनाअनुदानित संस्थांचा समावेश करणेबाबत मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल असल्याने मा. संचालकांचे पुढील आदेशापर्यंत केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर कोणतेही प्रवेश करण्यांत येऊ नये. असे प्रवेश केल्यास सदरचे प्रवेशांना तंत्रशिक्षण संचालनालयाकडुन मान्यता देण्यात येणार नाही. याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी. संदर्भांकित पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे.

(जे.आर. निखाडे)
सहा.संचालक (तां)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत:- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई -०१ यांना माहिती करीता सादर
२. प्रोग्रॅमर, सदर पत्र व परिपत्रक सहसंचालकांच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करावे.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in


अतिरिक्त प्रवेश फेरीबाबत सूचना

जा.क्र.१०/एनजीपी/पदविका/अतिरीक्त फेरी/२०१८/ ८८८
दि. 18 AUG 2018

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या शासकीय, अशासकीय अनुदानीत,विद्यापीठ विभागातील संस्थामध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांकरिता घेण्यात येणा-या अतिरिक्त प्रवेश फेरीमध्ये विनाअनुदानित संस्थांचा समावेश करणेबाबत...

संदर्भ:-१. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे असोसिएशन ऑफ द मॅनेटमेंट ऑफ पॉलीटेक्नीक्स व इतर यांनी महाराष्ट्र शासन व इतर विरुध्द दाखल केलेली रिट याचिका क्रमांक क्र. ९०९०/२०१८.
२. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे कर्मवीर काकासाहेब वाघ एज्युकेशन सोसायटी व इतर यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्द दाखल केलेली रिट याचिका क्रमाक २३४९५/२०१८.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेची तिसरी फेरी अनुक्रमे दि. १९.०८.२०१८ व २०.०८.२०१८ रोजी समाप्त होणार असुन तिस-या फेरीनंतर शासकीय, अशासकीय अनुदानीत, विद्यापीठ विभागातील संस्थामधील शिल्लक राहीलेल्या जागांकरीता तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत घेण्यात येणा-या प्रवेशाच्या अतिरिक्त फेरीबाबत वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आलेले आहे. सदरच्या अतिरिक्त फेरीमध्ये प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थांचा समावेश करण्यासाठी संदर्भाधिन रिट याचिकां मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केल्या आहेत. सदर याचिकांचा निकाल अद्यापपर्यंत या संचालनालयास अप्राप्त आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेश प्राप्त होताच न्यायालयीन आदेशानुसार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेची अतिरिक्त फेरीची पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे संदर्भाधिन याचिकांमधील आदेश प्राप्त होईपर्यंत प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थांनी केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेच्या तिस-या फेरीनंतर रिक्त राहीलेल्या जागांवर (Against CAP Seats) या संचालनालयाचे पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत संस्थास्तरावर प्रवेश करण्यात येऊ नयेत. असे प्रवेश केल्यास सदरचे प्रवेशांना तंत्रशिक्षण संचालनालयाकडुन मान्यता देण्यात येणार नाही, याची नोंद सर्व विनाअनुदानीत प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांनी घेण्यात यावी.

तसेच संदर्भाधिन न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचा निकाल प्राप्त होताच अतिरिक्त फेरीच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेबाबतची सुधारित अधिसूचना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:-माहीती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित
१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, मुंबई, पुणे
२) प्राचार्य/संचालक, प्रथम वर्ष व्यावसायिक पदविका अभियांत्रिकी व औषध निर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या सर्व विनाअनुदानित संस्था
३) कार्यासन क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई